| | कार्यालय, शिक्षण विभाग प्राथमिक,<br>जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर<br>E-mail Id - mdmabad@gmail.com<br>Website : https://aurangabadzp.gov.in/<br>दुरध्वणी क्रमांक - 0240-2329714 | |
|---|---|---|
| जा. क्र.जिपछसं/शिक्षण/प्रावि-3/2024-25/8612/7077 | | दिनांक :- 07.11.2024 |

प्रति,

**अध्यक्ष/सचिव**

सहारा शिक्षण प्रसारक मंडळ सिडको, औरंगाबाद संचलित
ज्ञानदान प्राथमिक विद्यालय बाळापूर परिसर, बीड बायपास
छत्रपती संभाजीनगर

**विषय** :- शाळा हस्तांतरणास परवानगी मिळणे बाबत.
सौ.गांधारीबाई प्रतिष्ठाण औरंगाबाद संचलित ज्ञानदान प्राथमिक विद्यालय बाळापूर, परिसर बीड बायपास छत्रपती संभाजीनगर ही अंशत: अनुदानित प्राथमिक शाळा सहारा शिक्षण प्रसारक मंडळ सिडको, औरंगाबाद या संस्थेस कायमस्वरुपी हस्तांतरण करणेबाबत.

**संदर्भ** :- 1.शासन निर्णय क्र. माशह/2011/(210/11) माशि-3/दि. 17.02.2012
2. शासन निर्णय क्र. माशाह/3124/प्र.क्र.347/24/एसएम-1 दि.26.08.2024
3. मा. शिक्षण उपसंचालक छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र क्र. जा.क्र.शिउसं/प्राथ/हस्तांतरण/2024/7586 दि.01.10.2024 प्राप्त दि.06.11.2024

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. 01 अन्वये सौ.गांधारीबाई प्रतिष्ठाण औरंगाबाद संचलित ज्ञानदान प्राथमिक विद्यालय, बाळापूर परिसर, बीड बायपास, छत्रपती संभाजीनगर या मराठी माध्यमाच्या शाळेचे सहारा शिक्षण प्रसारक मंडळ सिडको, औरंगाबाद या संस्थेस कायमस्वरुपी हस्तांतरण करणेबाबत खालील अटीच्या अधीन राहुन शासनाने मान्यता दिलेली आहे.

1. व्यवस्थापन बदल झालेल्या शाळेची किमान पटसंख्येची अट कोणत्याही कारणास्तव शिथिल केली जाणार नाही.
2. व्यवस्थापन बदल झालेल्या शाळेच्या बाबतीत शासन परवानगीच्या /मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.
3. शासनाकडुन शाळा, शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी,वेतन/वेतनेत्तर अनुदान, विदयार्थी इ. बाबत वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, आदेश इ. चे पालन करणे नवीन संस्थेस बंधनकारक राहील.
4. सदर व्यवस्थापन बदल, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.माशाह 2011/(210/11) माशि-3 दिनांक 17 फेब्रुवारी, 2012 मध्ये विहित केलेल्या नियमानुसार व कार्यपध्दतीनुसार अंमलात येईल.
5. सदर व्यवस्थापन बदलासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्याकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यास किंवा व्यवस्थापन बदलासंदर्भात अटी व शर्तीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास किंवा व्यवस्थापन बदलापूर्वीच्या संस्थेतील कार्यरत शिक्षक /शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तीचा नवीन संस्थेद्वारा भंग झाल्यास हस्तांतर रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

वरील अटी शर्तीच्या अधीन राहुन सौ.गांधारीबाई प्रतिष्ठाण औरंगाबाद संचलित ज्ञानदान प्राथमिक विद्यालय बाळापुर परिसर, बीड बायपास, छत्रपती संभाजीनगर या मराठी माध्यमाच्या शाळेचे सहारा शिक्षण प्रसारक मंडळ सिडको, औरंगाबाद या संस्थेस हस्तांतरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(जयश्री चव्हाण)
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर

प्रतिलीपी-

1.मा.प्रविण मुंढे, अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर

2.मा. शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे-01 यांना माहितीस्तव सविनय सादर.

3.मा. शिक्षण उपसंचालक छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव सविनय सादर.